आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

५ जुलै २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबईसह राज्याच्या विविध भागांमध्ये संततधार कायम, जनजीवन विस्कळीत

- विकसित भारत जी राम जी योजनेअंतर्गत राज्यांना २५ हजार कोटी रुपयांचा निधी केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या हस्ते वितरीत

- ऑगस्टपासून तेल उत्पादनात प्रतिदिन १८८ हजार बॅरलची वाढ करण्याचा ओपेकचा निर्णय

**आणि**

- विख्यात पंडवानी गायिका पद्मविभूषण तीजन बाई यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**<><><><><>**

राज्यात आजही मुंबईसह अनेक ठिकाणी जोरदार पाऊस सुरू आहे. ठिकठिकाणी पाणी साचल्यामुळे वाहतुकीला फटका बसला आहे. अनेक ठिकाणी झाडं पडली आहेत. यामुळे जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झालं. यासह राज्यभरातल्या पावसाबद्दलची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-***

***(मुंबईत*** *आज सोसाट्याच्या वाऱ्यासह कोसळणाऱ्या पावसामुळे दादर, माटुंगा, शिवाजी पार्क परिसर, घाटकोपर याठिकाणी अनेक झाडं उन्मळून पडली. कुर्ल्यात झाड अंगावर पडून एकाचा मृत्यू झाला. मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरची सर्व वाहतूक एक तास थांबवण्यात आली. यामुळे विमान वाहतुकीला मोठा फटका बसला. बृहन्मुंबई क्षेत्रात गेल्या २४ तासांत जुलै महिन्याच्या सरासरीच्या तुलनेत सुमारे ७४ टक्के पावसाची नोंद झाली आहे. क्षेत्राच्या विविध भागांत या कालावधीत २५० ते ३०० मिलिमीटर पावसाची नोंद झाली.*

***नवी मुंबई*** *परिसरात सकाळपासून पावसाचा जोर कायम आहे. पावसाबरोबर आलेल्या जोरदार वाऱ्यामुळे घणसोली आणि ऐरोली इथं इमारतींवरचे पत्रे उडून गेले.*

***ठाणे*** *जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचलं, तसंच झाडं उन्मळून पडली. ठाण्यात एका इमारतीची गॅलरी कोसळल्यानं दोन जण जखमी झाले. ठाणे शहरासह कल्याण, भिवंडी, उल्हासनगर, डोंबिवली आणि नवी मुंबईतले अनेक सखल भाग जलमय झाले असून, अनेक रहिवासी पाण्यात अडकले आहेत.*

***रायगड*** *जिल्ह्यात नेरळ हद्दीतल्या पेब किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या चौघांपैकी एकजण दरड कोसळून जखमी झाला. खोपोली इथल्या झेनिथ धबधब्याच्या परिसरात अडकलेल्या शंभराहून अधिक पर्यटकांची सुखरूप सुटका करण्यात आली. मुंबई-गोवा महामार्गावर सुकेळ खिंडीत पाणी साचल्यानं हा महामार्ग बंद आहे. तर रोहा-भिसे-नागोठणे मार्गावर भिसे खिंडीत दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाल्यानं हा रस्ता दिवसभरासाठी बंद केला आहे.*

***रत्नागिरी*** *जिल्ह्यात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे सर्व नद्यांची पाणीपातळी वाढली आहे. खेडमधल्या जगबुडी नदीनं धोका पातळी ओलांडली तर नारिंगी नदीचं पाणीही पात्राबाहेर आलं आहे.* ***सिंधुदुर्ग*** *जिल्हयात वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी पडझड झाली आहे. पावसामुळे जिल्ह्यातल्या सुमारे ७० गावांमधला वीज पुरवठा खंडित झाला आहे.*

***नाशिक*** *शहरासह जिल्ह्यात मध्यरात्रीपासून पावसानं उघडीप दिली.* ***अकोल्यात*** *मात्र म्हणावा तसा पाऊस झालेला नाही.* ***गडचिरोली*** *जिल्ह्यात भामरागड तालुक्यात दोन दिवस मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे लाहेरी-बिनागुंडा मार्गावरच्या गुंडेनूर नाल्याला पूर आल्यानं गुंडेनूर, पेरमलभट्टी, पुंगासूर या गावांचा संपर्क तुटला आहे.* ***पालघर, बुलढाणा, कोल्हापूर, सांगली*** *जिल्ह्यातही पाऊस झाला.)*

**<><><><><>**

विकसित भारत जी राम जी योजनेअंतर्गत केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज राज्यांना २५ हजार कोटी रुपयांचा निधी दूरस्थ पद्धतीनं वितरित केला. केंद्र सरकारनं या योजनेतला आपला वाटा दिला असून राज्य सरकारांनीही आपापला वाटा वितरित करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

***होल्ड... बाईट- शिवराज सिंह चौहान***

विकसित भारत जी राम जी कायदा १ जुलैपासून लागू झाला आहे. 'विकसित भारत' या संकल्पनेला अधिक गती देण्याकरता या कायद्याअंतर्गत येत्या ५ वर्षांमध्ये देशातल्या २ लाख

८६ हजार ग्रामपंचायतींमध्ये साडेसात लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली जाणार आहे, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

पश्चिम आशियात लागू झालेल्या युद्धविरामानंतर हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून 'एलएनजी' अर्थात, द्रवरुप नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरळीत सुरू झाल्यानंतर एलएनजीच्या पुरवठ्यावरचे आपत्कालीन निर्बंध सरकारनं मागे घेतले आहेत. या वर्षीच्या मार्च महिन्यात हे निर्बंध लादले होते.

<><><><><>

पेट्रोलियम निर्यातदार देशांची संस्था ओपेक प्लसने येत्या ऑगस्टपासून तेल उत्पादनात प्रतिदिन १८८ हजार बॅरलची वाढ करण्याचं ठरवलं आहे. सात ओपेक प्लस देशांच्या आज झालेल्या ऑनलाईन बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. सौदी अरेबिया, रशिया, इराक, कुवेत, कझाकस्तान, अल्जेरिया आणि ओमान हे देश ओपेक प्लस चे सदस्य असून पेट्रोलियम पदार्थांच्या जागतिक बाजारपेठेत स्थैर्य आणण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं या बैठकीनंतर काढलेल्या पत्रकात म्हटलं आहे. बाजारपेठेच्या मागणीनुसार हे उत्पादन कमी जास्त केलं जाईल असंही या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

विख्यात पंडवानी गायिका आणि पद्मविभूषण तीजन बाई यांचं आज निधन झालं. त्या ७० वर्षांच्या होत्या. गेल्या अनेक दिवसांपासून त्या आजारी होत्या आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. आज पहाटे सव्वा तीनच्या सुमाराला त्यांची प्राणज्योत मालवली. ताकदीचा आवाज, रंगमंचावरचा आकर्षक वावर आणि सादरीकरणाच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीतून त्यांनी पंडवानी या छत्तीसगडच्या लोककलेला वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या अद्वितीय योगदानासाठी त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीजन बाईंच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं. भारतीय संस्कृती जागतिक मंचावर नेण्यातलं त्यांचं योगदान सदैव स्मरणात राहील, या शब्दांत राष्ट्रपतींनी त्यांना आदरांजली वाहिली. तीजनबाईंनी भारताची समृद्ध लोकपरंपरा, विशेषतः महाभारताच्या अजरामर गोष्टी

जनमानसांपर्यंत नेल्या, असे गौरवोद्गार उपराष्ट्रपतींनी काढले. तीजन बाईंच्या निधनानं कला आणि संस्कृती विश्वाची अपरिमित हानी झाल्याची भावना प्रधानमंत्री मोदी यांनी व्यक्त केली. याशिवाय विविध क्षेत्रातले मान्यवर तीजन बाई यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून त्यांना आदरांजली वाहात आहेत.

<><><><>

परदेशी गुंतवणूकदारांनी जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून ७०८ कोटी रुपये मूल्याचे भारतीय समभाग खरेदी केले आहेत. गेले सलग तीन महिने परदेशी गुंतवणूकदार भारतीय समभागांची विक्री करत होते. जून महिन्यात केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेने केलेल्या अनेक उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम झाल्याचं आता दिसून येत आहे. जून अखेरपर्यंत ही विक्रीची लाट ओसरली असून आता खरेदी सुरु झाली आहे.

<><><><>

टेलिग्राम या लोकप्रिय संदेशवहन मंचावरून चित्रपट, ओटीटीवरील कार्यक्रम आणि इतर दृकश्राव्य सामग्रीची बेकायदा देवाणघेवाण रोखण्यासाठी केंद्र सरकारनं टेलिग्रामला नोटीस बजावली आहे. यासंदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल १५ दिवसांत सादर करण्याचे निर्देश माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं दिले आहेत. कॉपीराइटचं उल्लंघन हा केवळ दिवाणी नव्हे तर फौजदारी गुन्हाही असल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे. बेकायदा सामग्री हटवण्यासाठी सरकारच्या सूचनांची वाट न पाहता टेलिग्रामनं स्वतःहून प्रभावी उपाययोजना कराव्यात, असंही या नोटिशीत नमूद करण्यात आलं आहे. नियमांचं पालन न झाल्यास पुढील कायदेशीर कारवाईचा इशाराही सरकारनं दिला आहे.

<><><><>

इन्स्टाग्रामवरच्या सशुल्क जाहिरातींमधलं बाललैंगिक शोषण आणि शोषणात्मक आशयासंदर्भात केंद्र सरकारने मेटा या समाज माध्यम कंपनीला नोटीस बजावली आहे. बाललैंगिक शोषणाला प्रोत्साहन देणाऱ्या सर्व जाहिराती आणि आशय बंद करण्याचे आदेश सरकारने मेटाला दिले असून या प्रकरणी सात दिवसांच्या आत सविस्तर स्पष्टीकरणही मागितलं आहे.

<><><><>

व्यापार, स्थलांतर आणि इतर धोरणात्मक विषयांबाबत परराष्ट्र मंत्रालयाला आपण सल्ला देत असल्याचा दावा काही व्यक्ती समाज माध्यमांवर करत असून यासंदर्भात सशुल्क सेवा तसंच मंत्रालयाबरोबर कसं काम करावं, याबाबत लोकांना माहिती देत आहेत. याबाबतच्या दाव्याचं परराष्ट्र मंत्रालयानं खंडन केलं असून अशा व्यक्तींचा परराष्ट्र मंत्रालयाशी कोणताही संबंध नसल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. तसंच सर्वांनी समाजमाध्यमांवरच्या अशाप्रकारच्या खोट्या पोस्ट्सपासून सावधानता बाळगावी असं आवाहनही, मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी इंडोनेशियाला दिलेल्या भेटीला १०० वर्षं पूर्ण झाल्याप्रित्यर्थ इंडोनेशिया सरकारने येत्या वर्षभरात अनेक सांस्कृतिक कार्यक्रम करण्याचं ठरवलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा इंडोनेशिया दौरा उद्या सुरु होत आहे, त्यादरम्यान या शताब्दी कार्यक्रमांचा प्रारंभ होणार आहे. इंडोनेशियातले भारताचे राजदूत संदीप चक्रवर्ती यांनी आकाशवाणीला ही माहिती दिली.

गुरुदेवांच्या तीन महिन्यांच्या इंडोनेशिया भेटीत त्यांनी त्या देशाच्या संस्कृतीचा अभ्यास केला. इंडोनेशियाची मेणाच्या साहाय्याने वस्त्रे रंगवण्याची बाटीक कला त्यांनीच बंगालमध्ये नेली आणि आता ती शांतिनिकेतन बाटिक कला या नावाने प्रसिद्ध आहे. इंडोनेशियाचे पहिले शिक्षणमंत्री कि हजार देवान्तरा यांनी शांतिनिकेतनच्या संकल्पनेने प्रभावित होऊन इंडोनेशियामध्ये बागेतल्या शाळा सुरु केल्या होत्या.

**<><><><><>**

उत्तर कोरियाचे नेते किम जोंग उन यांनी देशाच्या नव्या नौदलातल्या 'कांग कोन' या युद्धनौकेवरून करण्यात आलेल्या क्रूझ क्षेपणास्त्रासह विविध शस्त्रप्रणालींच्या चाचण्यांचं निरीक्षण केलं.

सरकारी माध्यमांनी आज दिलेल्या वृत्तानुसार, ५ हजार टन क्षमतेच्या 'कांग कोन' या युद्धनौकेवर या चाचण्या शुक्रवारी पार पडल्या. या चाचण्यांचा उद्देश युद्धनौकेच्या लढाऊ प्रणालींची कार्यक्षमता तपासणे हा होता.

**//<><><><><>//**